# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०२/२०२५ (मंगळवार) सायंकाळ**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोस्टे बोरी** :— दिनांक ०३/०२/२०२५ रोजी बोरी पोलीस हे कामी जात असताना त्यांना दुर्वाश ले—आाडट नविन बस स्थानक मागे संशयीत निळा रंगाचा न्यु होलॅड ३०३० एक्स टी कंपनीचा ट्रॅक्टर क्रमांक एम एच ३६/ ७४४३ त्यास विनाक्रमांकाची ट्रॉली असलेले ट्रॅक्टर दिसुन आले म्हणुन संशयीत वाहनास थांबवुन पाहणी केली असता चालक आरोपी नामे १. संदीप ज्ञानेश्वर मरस्कोल्हे वय ४२ वर्ष रा. सेलडोह ता. सेलु जि. वर्धा हा मिळुन आले. ट्रॅक्टर ची पाहणी केली असता त्यात १ ब्रास रेती असल्याचे आढळुन आले. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असात त्यांच्या जवळ परवाना नसल्याचे सांगितले.आरोपीला वाहन मालकाचे नाव विचारपुस केली असता त्याने आरोपी मालक अनिल माधोराव कावळे वय ५० वर्ष रा. रूईखैरी ता.जि नागपुर असे सांगितले. आरोपीच्या ताब्यातील निळा रंगाचा न्यु होलॅड ३०३० एक्स टी कंपनीचा ट्रॅक्टर क्रमांक एम एच ३६/ ७४४३ त्यास विनाक्रमांकाची ट्रॉली किंमती ३,२०,०००/— रूपये ,१ ब्रॉस रेती किंमत ५,०००/— रूपये **एकुण ३,२५,०००/— रूपयाचा** माल पंचासमक्ष मुद्देमाल जप्त केला.

चालक **१.** संदीप ज्ञानेश्वर मरस्कोल्हे वय ४२ वर्ष रा. सेलडोह ता. सेलु जि. वर्धा मालक **२.** अनिल माधोराव कावळे वय ५० वर्ष रा. रूईखैरी ता.जि नागपुर यांच्या विरुद्ध ३०३(२),३(५) भा.न्या.संहिता कलम ४८(७),४८(८) महाराष्ट जमीन महसुल अधिनियम सह कलम ४,२१ खानी आाणि नियमन अधिनियम १९५७ सह कलम ३(१)/१७७,१३०/१७७ मो.वा.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे कोंढाळी:— अंतर्गत दिनांक ०१/०२/२०२५ चे २१.०० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे— प्रमोद अशोक सोहोलिया वय २९ वर्ष रा. चिखलागढ ता. काटोल ह. मु. आदर्श नगर वाडी नागपुर** व फिर्यादी नामे— सौ स्वाती उर्फ स्वीटी प्रमोद सोहोलिया, वय २६ वर्ष रा. चिखलागढ ता. काटोल ह. मु. आदर्श नगर वाडी नागपुर हे पती पत्नी असुन यातील नमुद आरोपीने मौजा नांदुरा फाटयाजवळ फिर्यादीस नेउन फिर्यादीचा जीव घेण्याच्या उददेशाने फिर्यादीच्या गळयावर ब्लेडसारखे धारदार वस्तुने मारून फिर्यादीच्या गळयावर जखम केली.

अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरुन पोस्टे कोंढाळी येथे अप क्र ४९/२०२५ कलम १०९ बीएनएस अन्वये गुन्हा नोंद करून तपासात आहे. यातील आरोपीस कोंढाळी पोलीसांनी अटक केली आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर